नि. फौ. ख. क्र.१२७/२०२३ निशाणी २४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – विष्णु तुळशीराम टेकाळे

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – शेती,

पत्ता – रा. मोरगाव सादीजन, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. माझ्याकडे मोरगाव सादीजन येथे ५ एकर शेती आहे. तसेच माझ्याकडे २ बैल, एक गाय व दोन वासरे आहेत. दि.२५.०३.२०२३ रोजी संध्या. ५ वा. सुमारास माझ्या शेतातून गुरे घेवून घरी आलो. तसेच माझी जनावरे ही हसनापूर रोड येथे असलेल्या गोठ्यामध्ये ६ वा. बांधले. त्यानंतर मी माझ्या घरी गेलो. त्यानंतर दि.२६.०३.२०२३ रोजी माझा मुलगा नामे शिवम हा सकाळी ७ वा. सुमारास गोठ्यामध्ये गेला होता व तो घरी आल्यानंतर त्याने मला सांगितले की, गोठ्यामध्ये बांधलेले दोन्ही बैल नाहीत. त्यानंतर मी माझ्या सदर बैलांचा जंगलात शोध घेतला. त्यापुर्वी मी गोठ्यामध्ये जावून पाहिले असता माझे बैल दिसले नाहीत. माझा एक बैल लाल रंगाचा व दुसरा पांढरा लाल रंगाचा उभे शिंगाचे होते. दि.२६.०३.२०२३ रोजी माझे बैल चोरीस गेल्याबाबत मी पो.स्टे. येथे अज्ञात इसमांविरुध्द रिपोर्ट दिला होता.

२. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येत आहे. त्यानंतर पोलीस हे घटनास्थळी आले होते, त्यांना मी घटनास्थळ दाखविले होते.

३. त्यानंतर मला दि.२७.०३.२०२३ हातरुण येथील व्यापाऱ्याने माहिती मिळाली की, तुमचे बैल हातरुण येथे आहेत. पोलीसांनी मला दि.२८.०३.२०२३ रोजी पो.स्टे. येथे बोलाविले होते. मी त्या ठिकाणी गेलो त्यावेळी पोलीस झाकर्डे, नेमाडे व गावातील माझे चलुतभाऊ, सरपंच होते. पोलीसांनी मला बैल दाखविले व ते माझेच आहेत

का याबाबत विचारणा केली. ते बैल माझेच असल्याचे मी ओळखले. सदरचे बैल हे हातरुण येथून पोलीसांनी व्यापाऱ्याकडून आणले होते. सदरचे बैल हे व्यापाऱ्याला सतिश शांताराम निखाडे व संतोष जयसिंग सोळंके यांनी विक्री केले होते. पोलीसांनी मला माझे बैल सतिश व संतोष यांनी माझ्या गोठ्यातून चोरुन व्यापाऱ्यांना विकल्याचे सांगितले. आरोपी क्र.१ व २ यांना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. सदरचे बैल हे मी पोलीसांकडून माझ्या ताब्यात सुपुर्तनाम्याद्वारे दिले. पोलीसांनी मला बॉड आणण्यास सांगितले मी पोलीसांना बॉड आणून दिल्यानंतर ते बैल माझ्या ताब्यात दिले. आता मला सदर सुपुर्तनामा दाखविण्यात आला तो तोच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः**

४. मी शेती करतो. शेती व्यतिरीक्त मी होमगार्डमध्ये नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की, दि.२५.०३.२०२३ रोजी मी निंबा फाटा येथे रात्रपाळी नोकरी निमित्त गेलो होतो. त्या दिवशी मी नोकरीकरीता संध्या. ७ वा. घरातून गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा गोठा मोरगाव हसनापूर रोडच्या बाजूला असून तेथील रस्त्यावर नेहमी लोकांची ये–जा सुरु असते. सदर गोठा माझ्या मालकीचा आहे.

मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांक : १२.०२.२०२६**
**ठिकाणः बाळापूर**

**( डी. एम. वाघमारे )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत पुढील उलटतपास शपथेवर सुरुः**

५. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. पोलसांनी माझा जबाब कोणत्या तारखेला हे मला आठवत नाही. माझ्या मालकीच्या गोठ्याबाबत माझ्याकडे दस्त उपलब्ध

होते. सदरचे दस्त मी पोलीसांना तपासकामी दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर गोठ्याची मालकी नसल्याने मी त्याबाबतचे दस्त तपासिक अधिकारी यांना दिलेले नाहीत. पोलीसांना मी माझ्या शेतीचा ७/१२ दिला नाही, पोलीसांनी तो मला मागितला नाही. माझ्याकडे असलेल्या जनावरांची नोंदणी मी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये केलेली होती. सदर नोंदणीबाबतचा दस्त मी पोलीसांना दिलेला नव्हता.

६. हे म्हणणे खरे आहे की, बैल व गोरा हे दोन्ही वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गोऱ्हा ज्यावेळी १५ ते २० वर्षाचा होतो, त्यावेळी आपण त्याला बैल म्हणतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावातून उरळ पो.स्टे. येथे जाण्याकरीता १५ ते २० मि. लागतात.

७. मी माझा जबाब देताना पोलीसांना "दि.२५.०३.२०२३ रोजी संध्या. ५ वा. सुमारास माझ्या शेतातून गुरे घेवून घरी आलो, तसेच त्यानंतर दि.२६.०३.२०२३ रोजी माझा मुलगा नामे शिवम हा सकाळी ७ वा. सुमारास गोठ्यामध्ये गेला होता, तसेच माझा एक बैल लाल रंगाचा व दुसरा पांढरा लाल रंगाचा उभे शिंगाचे होते, तसेच हातरुण येथील व्यापाऱ्याने माहिती मिळाली की, तुमचे बैल हातरुण येथे आहेत, तसेच ते बैल माझेच असल्याचे मी ओळखले, सदरचे बैल हे हातरुण येथून पोलीसांनी व्यापाऱ्याकडून आणले होते, तसेच सदरचे बैल हे व्यापाऱ्याला सतिश शांताराम निखाडे व संतोष जयसिंग सोळंके यांनी विक्री केले होते, पोलीसांनी मला माझे बैल सतिश व संतोष यांनी माझ्या गोठ्यातून चोरुन व्यापाऱ्यांना विकल्याचे सांगितले, तसेच मी सदर बैलांचा जंगलात शोध घेतला'' हा मजकूर सांगितला होता. सदरचा मजकूर हा माझ्या फिर्यादी जबाबात व बयानात का लिहीलेला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ सतिश याच्या मालकीचे शेत मी सन २०२१ – २२ मध्ये ठोक्याने करीत होतो, त्याकामी त्याचे वडील सदर शेतीबाबत ठोक्याचा व्यवहार माझ्यासोबत करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३ मध्ये सदरचे शेत मला ठोक्याने करावयाचे होते, परंतु आरोपी क्र.१ हा मला ते ठोक्याने देत नव्हता, त्यामुळे माझा व आरोपी क्र.१ याच्यामध्ये वाद झाला होता.

९. पोलीसांनी मला घटनास्थळी बोलाविले होते. पोलीसांनी मला दि.२६.०३.२०२३ रोजी घटनास्थळी दु. २ वा. बोलाविले होते. त्यानंतर पोलीसांनी मला घटनास्थळी बोलाविले होते, असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १२.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.12 18:00:08 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १२/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १२/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १२/०२/२०२६ |